REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गानिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ३ जानेवारी, १९४० अंक १

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.

— चालू हंगामाची नवी साखर सुरू झाली —

शुभ्र व दाणेदार साखऱ्या.

अंदाजी बारा लक्ष रुपयांची साखर तयार होईल.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड,
९८०, सदाशिव पेठ, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजन्ट.

अप-टु-डेट शिलाईकरितां महिंद्रकर ब्रदर्स

बुधवार चौक, पुणें

यांचेकडे चौकशी करा.

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### सुवासिक चित्रपट

चित्रपट सिनेमागृहांत दाखविले जात असतांना त्यांतील वस्तुस्थिति व हालचालींचे यथार्थ ज्ञान प्रेक्षकांस पूर्णपणें चाखावयास मिळावें ह्या उद्देशानें दोघा स्विस कल्पकांनीं युक्ति शोधून काढली आहे. तिच्या योगानें, उदाहरणार्थ, चित्रपटांत बागेचा देखावा असेल तर छायाचित्रें व आवाज ह्यांच्या बरोबर पटामधून फुलांचा सुवास दरवळण्याची व्यवस्था केलेली आहे. पण एखाद्या घाणेरड्या जागेचें चित्र असेल तर दुर्गंधीचा घमघमाट व्हावा लागेल, तो प्रेक्षकांस कितीसा आवडेल असें एक टीकाकार विचारतात.

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंतील खातीं

हिंदुस्थानांतील पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत प्रत्येकी सरासरीनें २५० खातीं आहेत आणि प्रत्येक खातेदाराची ठेव सरासरीनें १९३ रुपये आहे.

### सेव्हिंग्ज बँकेच्या खात्यांबाबत पंजाबचा पहिला नंबर

हिंदी पोस्ट खात्याच्या पंजाब व सरहद्द प्रांत ह्यांमधील टापूंत सर्वांत अधिक सेव्हिंग्ज बँकेचीं खातीं व सरासरीच्या ठेवी आहेत.

### साडिक तांदुळावर निर्बंध

जपानमध्यें साडिक तांदुळावर निर्बंध घालण्यांत आले आहेत.

### खाण्याच्या पदार्थांची नियंत्रित वाटणी

साखर, मांस, लोणी इत्यादि पदार्थांचा दरमाणशी उपयोग नियंत्रित करण्यांत येत आहे. आयात व्यापार शक्य तितका युद्धोपयोगी मालाचा व्हावा ह्या हेतूनें हें नियंत्रण केलें जात आहे. त्या योगानें जनतेची गैरसोय होण्याची भीति नाहीं असें सर्वसाधारण मत इंग्लंडमध्यें व्यक्त झालें आहे.

### पोस्टल बँकांत ८२ कोटि रुपयांच्या ठेवी

हिंदी पोस्टल बँकांत सुमारें ४२½ लक्ष खातीं असून त्यांतील ठेवींची एकूण रकम ८२ कोटि रुपये आहे.

### कॉमनवेल्थ कंपनीच्या भव्य इमारतीचें उद्घाटन

कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या पुणें येथील नवीन भव्य इमारतीचा उद्घाटन समारंभ मुंबईचे श्री. भगुभाई सुभेदार ह्यांच्या हस्तें आज ५॥ वाजतां मोठ्या थाटानें होणार आहे.

### जपानमध्यें ॲल्युमिनिअमचीं नाणीं

५ आणि १० सेनचीं दुय्यम नाणीं पूर्णपणें ॲल्युमिनिअमचीं करण्यास जपाननें प्रारंभ केला आहे. आतापर्यंत ह्या नाण्यांत ५% ॲल्युमिनिअम आणि ९५% तांबें असे. युद्धाच्या कामाकडे तांबें खर्च होत असल्यानें चलनाचे बाबतींत तें काटकसरीनें वापरणें आवश्यक झालें आहे.

### कुत्र्याचें घ्राणेंद्रिय

कुत्र्याचें घ्राणेंद्रिय अतिशय तीक्ष्ण असतें, परंतु त्याची दृष्टि विशेष चांगली नसते. कुत्र्यास त्याचें आरशांतील प्रतिबिंब स्वतःचें म्हणून ओळखतां येत नाहीं. तो रंगहि ओळखूं शकत नाहीं. कुत्रा आपल्या मालकास ओळखतो तें त्याच्या वासानें आणि आवाजानें.

### हिंद-जपान व्यापार कराराच्या वाटाघाटी

हिंदुस्थान व जपान ह्यांचेमध्यें व्हावयाच्या व्यापारी कराराच्या वाटाघाटी पुढील आठवड्यांत पुन्हां चालू व्हावयाच्या आहेत. त्यांमध्यें बिनसरकारी व्यापारी प्रतिनिधींचा सल्ला जरूरीप्रमाणें घेतला जाणार आहे.

### लंडनमध्यें पाण्याचा वापर

गेल्या वर्षीं लंडन शहरांतील लोकांनीं ११४¾ अब्ज गॅलन पाणी वापरलें. म्हणजे, दर माणशीं ४४ गॅलन पाणी लागलें.

### खिडक्या

ग्रेटब्रिटनमध्यें एकूण सुमारें १ कोटि घरें आहेत, त्यांस प्रत्येकी ६ खिडक्या आहेत, या हिशेबानें तेथील खिडक्यांची संख्या ६ कोटि होते. ह्या सर्व खिडक्या पडद्यांनीं बंद करावयाच्या म्हटल्या तर त्यासाठी १८ कोटि रुपयांचें कापड लागेल.

### हें सर्व १ पैशाची चूक दुरुस्त करण्यासाठी

ग्रेटब्रिटनमधील सरे येथील शाळेस दूध पुरविणाऱ्या डेअरीनें हेडमास्तराकडे १५ पौंड, १३ शिलिंग, ११¾ पेन्सांचें बिल पाठविलें; हेडमास्तराच्या रिपोर्टाप्रमाणें तें १५ पौंड, १४ शिलिंग होत होतें. शाळाधिकाऱ्यांनीं हें बिल आणि रिपोर्ट हेडमास्तराकडे परत पाठवून दुरुस्ती करण्यास सांगितलें आणि त्याप्रमाणें दुरुस्ती करण्यांत आली. एका फार्दिंगाची, म्हणजे एका पैशाची, दुरुस्ती करण्यांत वेळ गेला तो वेगळाच, परंतु त्यासाठी खालीलप्रमाणें खर्च आला:—डेअरीकडे पाठविलेल्या आणि डेअरीकडून आलेल्या पत्रांचें टपाल हंशील ३ पेन्स, डेअरीस फोन २ पेन्स, शाळाधिकाऱ्याच्या पत्रांचें टपाल हंशील १½ पेन्स, त्याच्या उत्तराचें टपाल हंशील १½ पेन्स.

### स्थानबद्धांचें देशांतर

जर्मनीनें त्या देशांत स्थानबद्ध झालेल्या ६० वर्षांवरील ब्रिटिश पुरुषांस आणि सर्व ब्रिटिश स्त्रियांस आणि मुलांस ग्रेटब्रिटनमध्यें जाऊं द्यावें आणि ग्रेटब्रिटननें जर्मन स्थानबद्धांचे बाबतींत असेंच करावें, अशी व्यवस्था स्विस आणि अमेरिकन सरकारांचे मध्यस्तीनें करण्यांत आली आहे.

### बनावट नाणीं

१९३८–३९ मध्यें सरकारकडे एकूण २,१६,७१८ बनावट नाणीं जमा झालीं. मुंबई प्रांतांत ४२,२९२ नाणीं जमलीं.

### ग्लॅक्सो लॅबोरेटरीज लि. वि. ग्लॅक्सो सर्जिकल कं.

सुप्रसिद्ध ग्लॅक्सो लॅबोरेटरीज लि. चें ग्लॅक्सो सर्वांस माहीत आहे. सिआलकोट येथील ग्लॅक्सो सर्जिकल कंपनीनें डॉक्टरांस लागणारे कांहीं जिन्नस "ग्लॅक्सो" ह्या नांवाखालीं विकले त्यामुळे ते जिन्नस ग्लॅक्सो लॅबोरेटरीज लि. चेच आहेत अशी त्यांची समजूत झाली आणि म्हणूनच त्यांनीं ते घेतले, अशी तक्रार ग्लॅक्सो लॅबोरेटरीज लि. नें ग्लॅक्सो सर्जिकल कंपनी विरुद्ध मुंबई हायकोर्टांत केली. हायकोर्टानें वादीचें म्हणणें मान्य करून सिआलकोटच्या कंपनीविरुद्ध निवाडा केला आणि त्या कंपनीस निरंतरची ताकीद दिली.

### तुर्कस्तानांत धरणीकंप आणि जलप्रलय

तुर्कस्तानामध्यें धरणीकंपानें आणि जलप्रलयानें कहर माजविला आहे. तुर्कस्तानास मदत करण्यासाठी फ्रेंच सीनेटनें ५० लक्ष फ्रँक्सचें कर्ज मंजूर केलें आहे.

## अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... २

२ अर्थशास्त्राच्या क्षेत्राची व्याप्ती ३

३ रोड काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन ... ... ४

४ स्फुट विचार ... ५

घसरलेले बाजारभाव आणि शेतकऱ्यांचें हितसंरक्षण— ह्या विषयासंबंधीं सरकारास सूचना—युद्ध आणि सक्तीच्या बचतीची योजना—गूळ करण्याचा कारखाना—युद्ध आणि हिंदी उद्योगधंदे—सोन्याचें उत्पादन आणि त्याचा संचय

५ हिंदी लोकसंख्येचा प्रश्न ८

६ कॉमनवेल्थ कंपनीच्या इमारतीचें उद्घाटन ... ९

७ कॉमनवेल्थचे अध्यक्ष आणि मॅनेजिंग एजंटस १०

८ निवडक बाजारभाव ११


# अर्थ

बुधवार, ता. ३ जानेवारी, १९४०

## अर्थशास्त्राच्या क्षेत्राची व्याप्ती

अलाहाबाद येथें हिंदी अर्थशास्त्रज्ञांची परिषद कालपासून लाहोरचे डॉ. जैन ह्यांचे अध्यक्षतेखाली चालू झाली. अर्थशास्त्राची व्याप्ती व विचार-पद्धती हा एक महत्त्वाचा विषय ह्या परिषदेंत चर्चिला जावयाचा आहे. त्या संबंधांत कित्येक हिंदी अर्थ पंडितांनीं निबंध लिहून परिषदेस सादर केले आहेत. अर्थशास्त्रास विधायक स्वरूप व बंदिस्तपणा प्राप्त होऊन दीडशे वर्षे होऊन गेलीं आहेत तरी त्याचें क्षेत्र आणि उद्दिष्ट काय असावें ह्याची चर्चा अजूनहि चालू रहावी ह्याचें अनेकांस आश्चर्य वाटेल आणि तें शास्त्र आहे का ह्याविषयीं शंका उत्पन्न होईल. पण अर्थशास्त्र हें भौतिक शास्त्र नसून समाजशास्त्राची एक शाखा आहे आणि मानवी पोटापाण्याचे व्यवहार हा त्याचा मुख्य विषय आहे, हें येथें विसरतां कामा नये. तत्त्वज्ञानांत ज्याप्रमाणें अनेक मतें आणि परंपरा आहेत, त्याप्रमाणेंच अर्थशास्त्राचें झालें आहे आणि परिस्थिति व ध्येय ह्यांस अनुसरून अर्थपंडितांनीं भिन्न भिन्न विचारसरणी व सिद्धांत पुढें मांडले आहेत. अर्थशास्त्राचा मानवी ऐहिक सुखदुःखाशी निकट संबंध येत असल्याकारणानें आणि गुंतागुंतीच्या मानवी जीविताविषयींच्या प्रश्नांची चर्चा त्यास कर्तव्य असल्यानें त्यांत मतांची भिन्नता व विचारांची विविधता दिसून आल्यास आश्चर्य नाहीं. ह्या मतभेदांच्या मागें चर्चेचा व अनुभवाचा परिणाम म्हणून अलीकडे कांहीं महत्त्वाच्या बाबींच्या संबंधांत बरेंच ऐकमत्य दृष्टोत्पत्तीस येत आहे.

अर्थशास्त्राचा विषय व्यक्ती आहे का समाज आहे, त्याचे सिद्धांत त्रिकालाबाधित आहेत का सापेक्ष आहेत, त्यांचा संबंध नीतीशी आहे का नीतीचा तें विचार करीत नाहीं, सामाजिक किंवा राजकीय ध्येयाशी त्यास कांहीं कर्तव्य आहे काय, त्याचे सिद्धांत व्यवहारास लागू करावे कीं नाहीं, मनुष्याचें व समाजाचें ऐहिक सुख हें त्याचें ध्येय आहे का तें ध्येयनिरपेक्ष आहे, इत्यादि प्रश्नांचा विचार त्या शास्त्राच्या बाबतींत केला जातो आणि त्यांपैकीं कित्येकांवर मतभेद व्यक्त करण्यांत येतात. स्वसुखेच्छु व्यक्ति हा अर्थशास्त्राचा मुख्य विषय आहे आणि भौतिक शास्त्रांसारखे सर्व काळीं व सर्व परिस्थितींत त्याचे सिद्धांत लागू असतात, ही एका काळच्या इंग्रजी पंडितांची कल्पना आतां कोणीच मानीत नाहीं. त्याचप्रमाणें, ह्या शास्त्राच्या सिद्धांतांचा भिन्न भिन्न परिस्थितींत उन्नति प्रीत्यर्थ उपयोग करणें आवश्यक आहे, हें मतहि बरीचशी मान्यता पावलें आहे. अर्थशास्त्राचे सिद्धांत ही केवळ बौद्धिक कसरत नसून त्यांचा उपयोग नित्याच्या व्यवहाराचे प्रश्न सोडवण्यास झाला पाहिजे हा अभिप्राय, त्याचप्रमाणें, अनेकांस पटला आहे. अर्थशास्त्रास स्वतःचें नैतिक किंवा राजकीय ध्येय नाहीं. तथापि, सामाजिक व राष्ट्रीय ध्येयें, मग तीं कोणतींहि असोत, साधण्यासाठी योजण्यांत येणारीं साधनें कार्यक्षम आहेत कीं नाहीं याचा विचार करणें हें अर्थशास्त्राचें कर्तव्य ठरतें. विशिष्ट ध्येयांचे पुरस्कर्ते ह्या शास्त्राच्या सिद्धांतांस व शिकवणीस त्यांच्या चौकटींत बसवूं पहातात आणि तेथें मुख्याचे मतभेद उद्भवतात. इतर ध्येयें व कक्षा असणारी नीति व राजकारण ह्यांविषयींची शास्त्रें आहेत, त्यांची अर्थशास्त्राशी गल्लत करण्यांत स्वारस्य नाहीं. दारिद्र्य व दुःख दूर करून संपत्ति व सुख साधण्याचा व्यक्ति प्रयत्न करतात आणि राष्ट्रीय व सामाजिक घटनेचा त्यांवर परिणाम होत असतो. ही परिस्थिति लक्षांत घेऊनच अर्थशास्त्रज्ञांनीं आपले सिद्धांत व मतें बनवणें अगत्याचें आहे.

प्रो. रॉबिन्स ह्या इंग्लिश अर्थपंडितानें अलीकडे ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांच्या जुन्या परंपरेचें पुनरुज्जीवन करण्याचा यत्न केला असल्यानें अर्थशास्त्राचें उद्दिष्ट आणि कक्षा ह्या विषयाच्या चर्चेस पुन्हां चालन मिळालें आहे आणि नवीन विचाराच्या अर्थशास्त्रज्ञांनीं हें शास्त्र आकुंचित व निर्जीव करण्याच्या ह्या प्रयत्नाचा निषेध केला आहे. अर्थशास्त्रास गणितशास्त्राचें स्वरूप देण्याची कांहीं पंडितांची प्रवृत्ति जुनी आहे. ती टाकून देऊन अर्थशास्त्रज्ञांनीं समाजाच्या आर्थिक उन्नतीस उपयोगी पडतील व उपकारक होतील असे सिद्धांत व अभिप्राय व्यवहाराच्या भरीव पायावर उभारावे असें मत अलीकडे बनत आलें आहे, त्याचा उल्लेख वर केला आहे. हिंदुस्थानासारख्या दरिद्री व मागसलेल्या देशांत अशाच प्रकारच्या अर्थशास्त्राची आवश्यकता आहे; आणि म्हणूनच न्यायमूर्ति रानडे ह्यांच्यासारख्या विद्वानाच्या परंपरेंत भारतीय अर्थशास्त्रज्ञांनीं ब्रिटिश अर्थ पंडितांची जुनी परंपरा मागें झुगारून दिली असून ह्या देशाच्या औद्योगिक उन्नतीस ज्याचा व्यावहारिक उपयोग होईल अशा अर्थशास्त्राची व्याख्या स्वीकारली आहे. अनेक ब्रिटिश अर्थ पंडितांनींच प्रो. रॉबिन्स ह्यांच्या आकुंचित विचारसरणीचा समाचार घेतला असून ती आपणांस अमान्य असल्याचें असंदिग्ध रीतीनें म्हटलें आहे हें सुचिन्ह होय. अलाहाबाद येथें भरलेल्या हिंदी अर्थशास्त्रज्ञांच्या परिषदेंत प्रस्तुत विषयाची चर्चा झाली हेंहि समाधानकारक आहे.

---

### साखर कमिटीवर प्रो. काळे ह्यांची नेमणूक

इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें स्वदेशी साखरेच्या धंद्याच्या व्यवस्थेची घडी नीट बसवण्याच्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून सल्ला देण्यासाठीं एक प्रातिनिधिक समिती नेमली आहे. पश्चिम हिंदुस्थानांतील साखरेच्या कारखान्यांचे प्रतिनिधि म्हणून तिच्यावर प्रो. काळे ह्यांची नेमणूक इंपीरियल कौन्सिलच्या अध्यक्षांनीं केली आहे.

## रोड काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन.

( लि. आ. म. )

गेल्या डिसेंबरचे पहिल्या आठवड्यांत मुंबई येथें 'इंडियन रोड काँग्रेस'चें वार्षिक अधिवेशन भरलें होतें. त्याकरितां हिंदुस्थानांतील ब्रिटिश व संस्थानी मुलुखांतून सुमारें दोनशें तज्ञ इंजिनीअर जमले होते. अध्यक्षस्थानीं हिंदुस्थान सरकारचे सल्लागार इंजिनीअर मि. मिचेल हे होते. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर रोजर लमले यांनीं समयोचित भाषण करून अधिवेशनास सुरवात केली. मि. मिचेल यांचेंहि रस्ते व तद्विषयक प्रश्न यावर माहितीपूर्ण असें भाषण झालें. अधिवेशनाचे पूर्वींच सर्व सभासद पुणें–मुंबईतील रस्त्यांची पाहाणी करून आले होते.

दहा–बारा सभासदांनीं हिंदुस्थानांतील रस्त्यांचे प्रश्नांबाबत निबंध पाठविले होते. मुंबई इलाख्यांतील इंजिनिअरांनीं फारसे निबंध पाठविलेले दिसत नव्हते. नाहीं म्हणावयास 'बर्मा शेल'चे श्री. वाघ यांचा एक निबंध होता. प्रत्येक निबंधावर सुमारें एक तास चर्चा झाली. चर्चेत बऱ्याच सभासदांनीं भाग घेऊन आपापले अनुभव सांगितले.

कलकत्ता येथील इंजिनीअर डॉ. कोर्णी यांनीं 'कँटिलिव्हर पद्धतीचे आर. सी. सी. पूल' या विषयावर एक निबंध वाचला. मुंबईचे श्री. सी. बा. जोशी इंजिनीअर व मि. निकोलायडिस् या दोघांनीं निबंधांतील क्लिष्ट गणितांतील दोषस्थळें फार मार्मिकपणें दाखविलीं. श्री. जोशी यांचें इंजिनिअरिंगला लागणाऱ्या गणितावरील प्रभुत्व वाखाणण्यासारखें होतें.

'कॉंक्रीटच्या रस्त्यांची दुरुस्ती' आणि 'कमी जाडीचे कांक्रीटचे रस्ते' या दोन विषयावर संयुक्त प्रांतांतील इंजिनिअरांनीं निबंध वाचले. त्यावरही बरीच चर्चा झाली. आसामचे इंजिनीअर श्री. दत्ता यांनीं 'डोंगर रस्त्यावरील भराव कसे घसरतात' या विषयावर स्वतःचे अनुभव व्यक्त करणारा निबंध वाचला. दिल्लीचे श्री. मेहरा यांनीं 'रस्त्यावरील सडी ने घातलेल्या दोन्ही बाजू कशा टिकवाव्या' या विषयावर निबंध वाचला. मद्रासचे श्री. लक्ष्मी नारायणराव यांनीं 'खडीचे रस्त्याऐवजीं स्वस्त डांबरी रस्त्याचा एक प्रकार' या विषयावर निबंध वाचला. बिहारचे श्री. अमीर यांनीं छोटा नागपूर येथील डांबरी रस्त्यांची कामें व मुंबईचे श्री. वाघ यांनीं 'रस्त्यावर बिट्युमिनचे पातळ थर' या विषयांवर निबंध वाचले. सर्वच निबंधांवर सभासदांनीं आपापले अनुभव सांगून चर्चेत भाग घेतला. परंतु इंजिनिअर नसलेल्यांना सुद्धां माहित असणें जरूर आहे असा निबंध बिहारचे सुपरिंटेंडिंग इंजिनीअर मि. मरेल यांनीं वाचला. त्यांचे निबंधाचा विषय 'ऑस्ट्रेलियांतील व हिंदुस्थानांतील रस्त्यांचे तौलनिक परीक्षण' असा होता. त्याचा सारांश असा—

'ऑस्ट्रेलियांत हिंदुस्थानाप्रमाणें प्रांतिक सरकारास मध्यवर्ती सरकाराकडून रस्ते बांधणीचे बाबतींत अडचण होत नाहीं. ऑस्ट्रेलियाची घटना हिंदुस्थानासारखीच आहे व रस्त्याचे योजनांच्या बाबतींत आपण ऑस्ट्रेलियाचे अनुकरण केल्यास आपल्या बऱ्याच कारभारविषयक अडचणी कमी होतील.

( १ ) हिंदुस्थानांत रस्त्यांचे बाबतींत तज्ञ इंजिनिअर कमी आहेत व त्यांची संख्या वाढविण्याकडे प्रवृत्तीहि नाहीं. जन्मभर पाणी पुरवठ्यामध्यें काम केलेल्यास सुद्धां रस्त्याचे कामावरील देखरेखीस लायक समजले जाते.

( ३ ) हिंदुस्थान अजून रानटी अवस्थेंतच आहे. त्याच्या त्या बैलगाड्या, त्या गाड्यांच्या लोखंडी धांवा, हीं भुतें हिंदी रस्त्यावरून नाहींशीं झाल्याशिवाय हिंदुस्थानांतील खेडोपाडी जाणारे रस्ते सुधारणार नाहींत व शहरचा माल खेडोपाडी जाणें-येणें सुलभ होणार नाहीं.

( ४ ) म्हणून सर्व बैलगाड्यांची नोंद करून लोखंडी धावा वापरणारावर जबर कर ठेवावा. रबरी धावा वापरणारांस आर्थिक साहाय्य करावें व अशा रीतीनें लोखंडी धांवा वापरणाऱ्या बैलगाड्यांचा नायनाट करण्याकरतां सरकारनें, सर्व इंजिनीअर लोकांनीं व मोटारींच्या असोसिएशन्सनीं कंबर कसावी.

( ५ ) अशा रीतीनें सुरवात झाल्यावर बैलांचा अंत फार लांब नाहीं. बैलगाड्यांना निराळे स्वस्त रस्ते तयार करून देऊन बैलगाड्यांचें आयुष्य वाढविण्याचें पाप कोणींही करूं नये. बैल नाहींसे झाले कीं, हिंदुस्थानांतील वनचराई कमी होईल व त्यामुळें हिंदी जमिनीवरील झाडें तशीच राहतील व जमीन धुपून जाण्यामुळें होणारें नुकसानही वाचेल.

( ६ ) ऑस्ट्रेलियांतील रस्त्यांची माहिती मिळविण्याकरतां येथील इंजिनीअरांचें कमिशन तिकडे पाठवावें. हिंदी विद्यार्थ्यांनींहि ऑस्ट्रेलिया वगैरे देश हिंडून यावे.

मि. मरेल यांनीं निबंधाबरोबरच निबंधांतील विचारसरणीला अनुसरून हिंदुस्थान सरकारला शिफारस करणारा ठराव सभेपुढें मांडला.

विषय चर्चेला ठेवल्याबरोबर श्री. सी. बा. जोशी यांनीं निबंधांतील विचारसरणीला विरोधदर्शक असें सडेतोड भाषण केलें तें पुढील अंकांत देण्यांत येईल. ( अपूर्ण )

### टेलिफोनचे नवे दर

मुंबई येथील टेलिफोनचे दर खालीलप्रमाणें आहेतः—वार्षिक १८० रुपये; त्रैमासिक ४५ रुपये; मासिक १६ रुपये. ह्या पद्धतीनें ज्यांस टेलिफोन चालू ठेवावयाचा असेल, त्यांस तो ठेवतां येईल. परंतु कंपनीनें टेलिफोनच्या दरांची नवीन पद्धतहि अंमलांत आणली आहे, ती अशीः—टेलिफोन बसविण्याची फी १० रुपये; दरमहा ८ रुपये आणि टेलिफोन करतांना प्रत्येक वेळेस १ आणा. ज्यांना महिन्यांतून ११२ पेक्षां कमी वेळां फोन करण्याचा प्रसंग येतो, त्यांस ही दुसरी पद्धति फायदेशीर वाटेल.


## नोटीस

### दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. पुणें २.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. पुणें, या कंपनीच्या भागीदारांची पांचवी वार्षिक साधारण सभा पुणें येथें कंपनीच्या मुख्य कचेरींत ( कॉमनवेल्थ, ९८० लक्ष्मी रोड, सदाशिव पेठ ) ता. २ डिसेंबर १९३९ रोजीं दुपारीं ४ वाजतां भरली होती. तिचें काम त्या दिवशीं तहकूब होऊन सदर सभा ता. २१-१-४० रोजीं भरवावी असें ठरलें. त्याप्रमाणें सदर सभा २१–१–४० रोजीं कंपनीच्या मुख्य कचेरींत ( कॉमनवेल्थ, ९८० लक्ष्मी रोड, सदाशिव पेठ, पुणें शहर ) दुपारीं २ वाजतां भरणार आहे. तरी सर्व भागीदारांनीं सभेस हजर रहावें अशी विनंति आहे.

संचालक मंडळाचे हुकुमावरून,
सी. जी. आगाशे ॲण्ड को,
मॅनेजिंग एजन्ट्स.

पुणें, ता. २८–१२–३९.

# स्फुट विचार

### चढलले बाजारभाव आणि शेतकऱ्यांचें हितसंरक्षण

युद्धामुळें बाजारभाव एकदम कडाडले आणि मर्यादित प्राप्ती असणाऱ्या सामान्य जनतेची कुचंबणा होऊं लागली तेव्हां महागाईचें सरकारनें नियंत्रण केलें पाहिजे अशी ओरड चोहोंकडे होऊं लागली. ह्या संबंधांत नफाबाजीस तात्काळ आळा घालण्यांत यावा, परंतु मालाचें वर्गीकरण करून बाजारभावांत योग्य वाढावा किती व कोठें चालू धावयाचा हें सरकारनें ठरवावें, सरसकट किंमतींचें नियंत्रण करूं नये असें आम्हीं "अर्था"त सुचवलें होतें. शेतीच्या मालाचे भाव युद्धपरिस्थितीमुळें थोडे चढले आहेत आणि ह्या महागाईपासून बिनशेतकरीवर्गाची थोडी गैरसोय होणें स्वाभाविक आहे. तथापि, हिंदुस्थानांत शेतीचा धंदा अत्यंत महत्त्वाचा असून त्यावर शेकडा पाउणशे लोकसंख्येची उपजीविका अवलंबून आहे. तसेंच, गेलीं दहा वर्षें आर्थिक मंदीमुळें शेतकरीवर्गाची अवस्था शोचनीय झाली असून त्याच्या कर्जाचा बोजा डोईजड झाला आहे. त्या स्थितीवर प्रांतिक सरकारांनीं उपाययोजना आखल्या आहेत आणि त्या यशस्वी होण्यास शेतीच्या मालाच्या किंमती थोड्या फार चढणें अगत्याचें आहे. अशा परिस्थितींत बाजारभावांचें नियंत्रण कर्तव्य असतां शेतीच्या धंद्याचें व शेतकरीवर्गाचें हितसंरक्षण करणें आवश्यक आहे. बिगरशेतकरीवर्ग आणि शेतीतर धंदे ह्यांच्या हितास बाधक अशा गोष्टी घडल्या असतां त्यांचा प्रतिकार व्हावा म्हणून सर्वत्र हाकाटी होते आणि ती परिणामकारकहि होते. पण शेतकऱ्यांच्या अडचणींसंबंधांत असें होत नाहीं. म्हणून बाजारभावांच्या चढीचें नियंत्रण करण्याविषयीं सरकारकडे निकडीची मागणी होत आहे, अशा वेळीं शेतीच्या मालाच्या विशिष्ट परिस्थितीकडे लक्ष वेधणें अगत्याचें झालें आहे.

---

### ह्या विषयासंबंधानें सरकारास सूचना

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या चिटनवीसांनीं हिंदुस्थानसरकारास एक पत्र पाठवून त्यांत वर व्यक्त केलेले विचार पुढें मांडले आहेत. मागील महायुद्धाच्या अनुभवावरून सर्व राष्ट्रांनीं योग्य तो बोध घेऊन नफेबाजी विरुद्ध पद्धतशीर उपाय अंमलांत आणले आहेत आणि हिंदुस्थानांतहि तसें होणें जरूर असल्याचें ह्या पत्रकांत म्हटलेलें आहे. तथापि बाजारभावाच्या नियंत्रणाबाबत चुकीच्या कल्पनांचा परिणाम सरकारच्या धोरणावर होणार नाहीं अशी खबरदारी घेणें अगत्याचें असल्याचें त्याच बरोबर सुचवण्यांत आलें आहे. १९२९ सालीं ताग, कपास, गहूं, गळिताचीं धान्यें इत्यादि शेतीच्या मालाचे भाव पडले, ते हिंदुस्थानांत परवांपर्यंतहि सावरले नाहींत. इतर देशांत १९३३–३४ च्या सुमारास बाजारभाव सावरले आणि १९३७ मध्यें तर त्यांस चांगली तेजी आली. हिंदी शेतकऱ्यांची कमाई वाढण्यासाठी जरूर ते उपाय योजले जावे अशी सरकारास विनंति करण्यांत आली, पण शेतकरी वर्गाची हलाखी दूर करण्याचा प्रयत्न झाला नाहीं. प्रस्तुत युद्धामुळें बाजारभाव थोडे चढून त्या वर्गास अत्यावश्यक असलेलें सहाय मिळण्याची वेळ आली. तरीहि १९२८–२९ सालांत शेतकऱ्यांस भाव मिळत होते तेथपर्यंतहि किंमतीच्या चढीची मजल गेलेली नाहीं. अशा स्थितींत चढलेल्या बाजारभावांचा फायदा मिळण्याचा त्या वर्गाचा हक्कच आहे, तो हिरावून घेतला जातां कामा नये असें फेडरेशनच्या पत्रांत म्हटलें आहे. शिवाय सरकारास अशीहि सूचना करण्यांत आली आहे कीं, चढलेल्या किंमतींचा फायदा शेतकऱ्यांच्या पदरांत पडण्यासाठीं हिंदी शेतमालाच्या निर्गत व्यापारास उत्तेजन दिलें जाणें आवश्यक आहे. ह्या बाबतींत जरूर ते उपाय मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं योजावे अशी विनंति फेडरेशननें केली आहे. फ्रान्समध्यें तेथील सरकारानें शेतीच्या मालास नियंत्रण लागू केलेलें नाहीं हा दाखला त्यानें दिला आहे आणि ह्या संबंधांत मध्यवर्ती सरकाराच्या खास जबाबदारीकडे लक्ष वेधलें आहे. सात प्रांतांत लोकनियुक्त प्रधानमंडळें अस्तित्वांत नसल्यानें ही जबाबदारी वाढली आहे आणि लोकप्रतिनिधींचा सल्ला घेण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्सनें हा विषय विशद करून हिंदुस्थान सरकारापुढें मांडला ही समाधानाची गोष्ट आहे.

---

### युद्ध आणि सक्तीच्या बचतीची योजना

शांततेच्या काळांत प्रत्येक राष्ट्राचें सरकार स्वतःच्या योगक्षेमाकरितां जनतेच्या प्राप्तीमधून आवश्यक वाटणारा अंश काढून घेत असतें. युद्धाच्या परिस्थितींत सरकारचा खर्च वाढतो आणि हा अंश त्यास वाढवावा लागून जनतेच्या हातांत खर्चावयास मर्यादित प्राप्ति उरते. तथापि, सरकारनें करांच्या स्वरूपांत लोकांकडून घ्यावयाच्या प्राप्तीच्या वांट्यास मर्यादा आहे. तिच्या पलीकडे जाणें अव्यवहार्य ठरतें आणि सरकारी युद्धकर्जांच्या मार्गानें जनतेची मिळकत राष्ट्रीय तिजोरीकडे आकर्षण्यांत येते. परंतु युद्धकाळांत बाजारभाव चढतात आणि जनतेच्या हातांत नेहमीच्या मानानें अधिक चलन खेळतें. ह्या बाबतींत आज इंग्लंडमध्यें अवघड प्रश्न उपस्थित झाला आहे तो जनतेच्या हातीं जरूरीपेक्षा अधिक पैसा राहूं नये आणि तो सरकारास खर्चण्यास उपयोगी पडावा ह्यासाठीं उपाय योजण्याचा आहे. जे लोक प्राप्तीवरचा कर देत नाहींत, त्यांचा पैसा कोणत्या युक्तीनें सरकारच्या तिजोरीकडे वळवावा हें ठरवणें महत्त्वाचें असलें तरी अवघड आहे आणि त्या कामीं नेहमीच्या परिचयाचे मार्ग उपयोगी पडण्यासारखे नसतात. प्रो. केन्स ह्यांनीं लंडन टाइम्सला पत्रें लिहून असा तोडगा सुचविला आहे कीं अगदी लहान मिळकती वगळून बाकी सर्वांमधून सध्याच्या प्राप्तीवरील करापेक्षा अधिक दरानें रकमा सरकारनें प्रथम काढून घ्याव्या, नंतर ह्या रकमांतून मामुली दरानें प्राप्तीवरील कर वसूल करावा आणि शिल्लक राहील ती कर देणारांच्या नांवानें पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत जमा करावी. ह्या ठेवींवर व्याज दिलें जाईल, पण त्या युद्ध चालू आहे तोंवर काढून घेतां येणार नाहींत आणि पुढेंहि युद्धोत्तर काळांत आर्थिक मंदीच्या परिस्थितींत जरूरीप्रमाणें हप्त्याहप्त्यानें परत दिल्या जातील. वर निर्दिष्ट केलेला युद्धकालीन खर्चाचा हेतु साध्य करण्याचें सामर्थ्य प्रो. केन्स ह्यांच्या युक्तींत आहे ह्यांत शंका नाहीं. परंतु ती कितीशी व्यावहारिक होईल व लोकांस रुचण्यासारखी आहे हाच मुख्य प्रश्न आहे.

---

# विमेदारांच्या विश्वासाचें प्रतीक

## दहा वर्षांतील प्रगति

विमानिधि रु. १४ लाखांचे वर

एकंदर जिंदगी रु. १९ लाखांचे वर

**भागीदारांस नफा शे. ७**

**विमेदारांस त्रैवार्षिक नफा**

**दर हजारीं**

| हयातीनंतरचे विम्यावर | हयातींतील विम्यावर |
| --- | --- |
| **रु. ५४** | **रु. ४५** |

एजन्सीचे अटीकरितां अगर विम्याचे माहितीकरितां लिहा.


रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.

मॅनेजिंग एजन्टस.

कॉमनवेल्थची नवीन

म्हणजेच

वैभवशाली इमारत



मुख्य कचेरी:- लक्ष्मी रोड, पुणें.

## कॉमनवेल्थचा

### *नागरिकत्वाचा संदेश*–

ज्या देशांतील नागरिक शरिरानें सुदृढ, मनानें विशाल व आर्थिक दृष्ट्या संपन्न असतात, तोच देश बलिष्ठ असून, त्याला चांगल्या पुढाऱ्यांचें धुरीणत्व लाभतें. 'कॉमनवेल्थ'नें आपल्या दहा वर्षांच्या अस्तित्वांत नागरिकांच्या कर्तव्याचा दिव्य संदेश हिंदुस्थानांतील कानाकोपऱ्यांतून पोंचविण्याचें कार्य केलें आहे, व हेंच 'कॉमनवेल्थ'च्या वैभवाचें व प्रगतीचें मुख्य लक्षण होय. 'कॉमनवेल्थ'चे प्रचारक देश बलवान् व संपन्न होण्याकरितां यथाशक्ति मदत करतात, एवढेंच नव्हे, तर ते इतरांस 'कॉमनवेल्थ'चा दिव्य संदेश पटवून देऊन त्यांनाहि आपला देश संपन्न व सर्वशक्तिमान् करण्यास उद्युक्त करतात.

# कॉमनवेल्थ विमा कंपनी, लिमिटेड, पुणें शहर.

### गूळ करण्याचा कारखाना

उसापासून उंची जातीचा गूळ करण्याविषयीं महाराष्ट्राची ख्याती आहे. महाराष्ट्रीय गुळाचा टिकाऊपणा, वाणेदारपणा व रंग वापरणारांस विशेष पसंत होत असून त्यास दूरदूरच्या प्रांतांतहि चांगली मागणी असते, हें प्रसिद्ध आहे. इकडील हवापाणी व जमीनीचें वैशिष्ट्य ह्यांमुळें महाराष्ट्रांत तयार होणाऱ्या गुळास हें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. तथापि, गुऱ्हाळाचा धंदा लहान प्रमाणावर व जुन्या पद्धतीनें होत असल्यानें तो व्हावा तसा फायदेशीर होत नाहीं असा अनुभव आहे. मुठा, गोदावरी व निरा ह्या नद्यांच्या कालव्यांवर सुधारलेल्या जातींचा ऊंस विस्तृत प्रमाणावर कांहीं बागाईतदार अलीकडे करीत असतात, पण आर्थिक मंदीच्या परिस्थितीमुळें गुळाचे भाव उतरल्यानें त्यांचा धंदाहि असमाधानकारक स्थितींत कित्येक वर्षें चालून गेल्या सालीं व यंदा काय ते त्यास बरे दिवस लाभले आहेत. पण नैसर्गिक परिस्थितीचा आधुनिक पद्धतीच्या उत्पादनाचे सहायानें अधिकांत अधिक फायदा घेण्याचा प्रश्न शिल्लक रहातोच. तो सोडण्याचा प्रयत्न निरा कालव्यावर विस्तृत क्षेत्रांत श्री. डब्ल्यू. बी. चितळे ह्यांनीं करण्याचें योजलें आहे त्याकडे येथें वाचकांचें लक्ष वेधावयाचें आहे. ऊंस व गूळ करण्याचें शास्त्रीय व व्यावहारिक ज्ञान आणि कित्येक वर्षांचा ह्या धंद्यांतला अनुभव ह्यांची त्यांचे योजनेंत जोड आहे. उंसाच्या पिकास योग्य अशी जमीन, कालव्याच्या पाण्याचा पुरवठा, गुळाच्या विक्रीची चांगली व्यवस्था, आधुनिक स्वरूपाची पण मध्यम आकाराच्या कारखान्याची उभारणी इत्यादि गोष्टींची त्यांनीं हातीं घेतलेल्या उपक्रमास अनुकूलता आहे. गुळाच्या उत्पादनाचा धंदा करणारांस भारी व्याजानें भांडवल कर्जाऊ घ्यावें लागून योग्य नफ्यास मुकावें लागतें. ही अडचण संयुक्त भांडवलाची कंपनी उभारून दूर करण्याचें श्री. चितळे ह्यांनीं योजलें आहे. त्यांच्या प्रसिद्ध केलेल्या योजनेंत उत्पादन खर्च व नफा ह्यांचा अंदाज धरला आहे तो बाजारभावाचा सरासरीनें विचार करतां युक्त वाटतो. ऊंस व गूळ ह्यांच्या धंद्याचा अनुभव असलेल्या अनेक तज्ज्ञांनीं श्री. चितळे ह्यांच्या योजनेस संमति दर्शविली आहे हें तिच्या ग्राह्यतेविषयींच्या अभिप्रायाचें द्योतक आहे. श्री. चितळे ह्यांनीं बरेच परिश्रम करून आणि अनुभव मिळवून आपली गुळाच्या कारखान्याची योजना उभारली आहे. ह्या कारखान्याची यंत्रसामुग्री व इतर साधनें देशांतल्या देशांत मिळण्यासारखीं आहेत आणि चांगल्या गुळास मागणी कायमचीच आहे. ह्या गोष्टी नवीन कारखान्यास अनुकूल आहेत. ह्या प्रकारचा प्रयत्न महाराष्ट्रांत पहिलाच आहे, ह्या दृष्टीनें त्याचें वैशिष्ट्य आहे.

---

### युद्ध आणि हिंदी उद्योगधंदे

मागील महायुद्धांत, विशेषतः त्याचें क्षेत्र मेसापोटेमियाच्या बाजूस पसरल्यामुळें आणि तें दीर्घकालपर्यंत चालल्या कारणानें, युद्धोपयोगी कच्चा-पक्का माल मोठ्या प्रमाणांत हिंदुस्थानांतून पुरवावा लागला. ह्याचा परिणाम असा झाला कीं, हिंदी मालास चांगली मागणी व किंमत येऊन हिंदी कारखान्यांचा विस्तार करावा लागला आणि नवीन कारखाने काढवें आवश्यक झालें. स्वदेशी धंद्यांच्या प्रगतीस ह्या रीतीनें सहाय मिळालें आणि सरकारासहि त्यांस उत्तेजन देण्याचें धोरण स्वीकारावें लागलें. ह्यातून युद्धांत ही परिस्थिति मर्यादित प्रमाणांत उपस्थित झाली असली तरी हिंदुस्थानास युद्धोपयोगी माल पुरवणें व तयार करणें ह्या गोष्टी कराव्या लागत आहेत. 'एकॉनॉमिस्ट' ह्या ब्रिटिश साप्ताहिकाच्या हिंदुस्थानांतील बातमीदारानें असें कळविलें आहे कीं ऑक्टोबर अखेर १४ कोटि रुपये किंमतीचा माल ह्या देशांतून पुरवला जाण्याविषयीं मागण्या आल्या आहेत. नेहमीं न होणारा मालहि ह्या देशांत तयार होण्याची आवश्यकता भासत आहे आणि ह्याचा परिणाम स्वदेशी धंद्यांची प्रगती होण्यामध्यें झाल्यावांचून रहाणार नाहीं असें त्याचें म्हणणें आहे. कारखान्यांच्या मालकांच्या मंडळाची (एम्प्लॉयर्स फेडरेशन इन इंडिया) कलकत्ता येथें नुकतीच वार्षिक सभा झाली, तीमध्यें अध्यक्ष, सर होमी मोदी, यांनीं वरील विषयाचें विवेचन केलें. कांहीं धंदे प्रत्यक्ष सरकारास काढावे लागतील आणि इतर धंद्यांस उत्तेजन व सहाय त्यास द्यावें लागेल असें त्यांनीं सांगितलें आणि हिंदुस्थान सरकारनें हिंदी धंद्यांस हेतुपूर्वक मदत देण्याचें महत्त्व प्रतिपादिलें.

---

### सोन्याचें उत्पादन आणि त्याचा संचय

सोन्याच्या उत्पादनाचे बाबतींत दक्षिण आफ्रिकेचा अनुक्रम पहिला लागतो. तेथील खाणींतून निघणारें सोनें रशिया, अमेरिका आणि कॅनडा ह्यांच्या खाणींतून निघणाऱ्या एकूण सोन्यापेक्षा अधिक भरतें. गेल्या वर्षी सोन्याचें जागतिक उत्पादन ३ कोटि, ६७३ लक्ष औंस झालें, त्यापैकी १ कोटि, २२ लक्ष औंस सोनें दक्षिण आफ्रिकेंतील होतें. रशियांत ५० लक्ष औंस, कॅनडांत ४७ लक्ष औंस आणि अमेरिकेंत ४३ लक्ष औंस सोनें निघालें. गेल्या कांहीं वर्षांत चलनासाठी सोन्याची इतकी मागणी वाढली आहे, कीं लोकांनीं दागिन्यांत घातलेलें सोनें त्यांस वितळवावें लागलें आहे. बहुतेक देशांनीं सुवर्ण चलनाचा त्याग केला असला, तरी चलन व्यवस्थेसाठीं सोन्याचा अधिकाधिक साठा लागू लागला आहे. १९३१ मध्यें चलनाकरितां सुमारें ५९३ कोटि औंस सोनें उपयोगांत आणलेलें होतें, १९३८ सालीं ८५३ कोटि औंस सोनें त्यासाठीं गुंतलेलें होतें.

---

### हिंदी लोकसंख्येचा प्रश्न

"गेल्या ६० वर्षांत हिंदुस्थानांतील लोकसंख्या ३५% ते ४०% वाढली असून ती आतां सुमारें ३४ कोटि झाली आहे. दुष्काळ, प्लेग, मलेरिया, इत्यादींमुळें तिच्या वाढीस आळा बसला नसता तर ती ह्यापेक्षा कितीतरी अधिक झाली असती. "हिंदुस्थानांत लोकसंख्येची वाढ फाजील झाली आहे काय?" ह्या प्रश्नाचें उत्तरांत एकवाक्यता दिसून येत नाहीं. हिंदुस्थानच्या कांहीं विभागांत वस्ती अतिशय दाट तर कांहीं विभागांत ती अतिशय विरल आहे. हिंदुस्थानांत सध्यापेक्षा अधिक लोकसंख्येचा चरितार्थ चालू शकेल; मात्र तिची प्रांतवार विभागणी नीट झाली पाहिजे, असें कांहीं म्हणतात. ही गोष्ट प्रत्येक देशास लागू असते. लोकांची आपल्या रहाणीकडे पहाण्याची दृष्टि कोणती आहे, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थानांतील जननाचें प्रमाण इंग्लंडमधील तत्सम प्रमाणापेक्षा दुपटीहून अधिक आहे, ह्याचें कारण येथें विवाह ही एक रूढि समजली जाते आणि पूर्वापार चालत आलेल्या गोष्टी चालू ठेवण्यास वारस पुत्राची प्रत्येकास आवश्यकता भासते. व्यक्तीचा उत्कर्ष हें ध्येय आहे कीं समाजाचा सामुदायिक व्यापक उत्कर्ष हें ध्येय आहे ? हा प्रश्न येथें महत्त्वाचा आहे."

—स्टेटिस्ट

# कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या प्रगतीचा त्रोटक वृत्तान्त

## १९२८ ते १९३९

कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या प्रस्थापनेस भारतविख्यात लोकाग्रणींचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. गाढ विद्याव्यासंग व राजकीय कार्यसिद्धि यासंबंधीं पुणें शहराचा लौकिक अनेक शतकांपासूनचा आहे. परंतु औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्रीयांनीं विशेष प्रकारची कामगिरी अगदीं अलीकडच्या काळापर्यंत केलेली नव्हती. पुण्यासारख्या इतिहासप्रसिद्ध शहरांत १९२८ सालापर्यंत संपूर्ण स्वदेशी अशी एकहि विमा कंपनी नसावी हें महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रांतील औदासीन्याचें मोठें ठळक उदाहरण होतें. तीव्रतेनें भासणारी ही उणीव भरून काढण्याचे कामीं श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी., आणि श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए. यांनीं पुढाकार घेतला, व महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि व्यापारविषयक क्षेत्रांत धडाडीनें पहिलें पाऊल टाकलें. अनेक प्रसिद्ध पुढाऱ्यांचें साहाय्य त्यांनीं संपादन केलें व तारीख १९ नोव्हेंबर १९२८ या दिवसाच्या शुभ मुहूर्तावर 'कॉमनवेल्थ' विमा कंपनीची रीतसर स्थापना झाली. कंपनीच्या सुदैवानें प्रारंभापासूनच कंपनीला लोकोत्तर पुढाऱ्यांचा आश्रय व सहानुभूति मिळत गेली. कंपनीचे पहिले अध्यक्ष श्री. तात्यासाहेब केळकर, यांच्या मार्गदर्शनाचा कंपनीला मोठा फायदा झाला. तसेंच प्रोफेसर श्री. वा. गो. काळे, एम. ए.; कै. बाबासाहेब देवधर; खा. ब. एम्. एन्. मेहता; रा. ब. डॉ. आर. के. नायडू; श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार; शेठ राजमल लखीचंद; लोकनायक माधवरावजी अणे; श्री. वा. सि. कामत, बी.ए.; श्री. हरिभाऊ तुळपुळे, बी. ए., एलएल. बी. इत्यादि पुढारी कंपनीच्या संचालक मंडळावर असल्यामुळें, कंपनीचा उत्कर्ष झपाट्यानें होत गेला.

### मिळालेलें काम

इतर संचालकहि बहुजनसमाजाच्या आदरास व विश्वासास पात्र असलेले असेच असल्यामुळें, कंपनीसंबंधींचा आदर व विश्वास जनतेमध्यें एकसारखा वृद्धिंगत होत गेला व त्याचा योग्य तो परिणाम होऊन आज सर्व हिंदुस्थानभर व बाहेरहि कंपनीचे वीस हजारांपेक्षा अधिक विमेदार आहेत. त्या सर्वांची एकूण विम्याची रक्कम दोन कोटी पन्नास लाखांपेक्षा अधिक आहे व कंपनीची एकूण जिंदगी सुमारें एकोणीस लाख रुपये आहे. कंपनीनें जें हें लोकोत्तर यश अल्पावधींत संपादन केलें त्यामुळें हिंदी जनतेच्या अंतःकरणांत आयुर्विमा संस्थेसंबंधीं दृढ विश्वास निर्माण झाला. आज कंपनी आपल्या स्वतःच्या प्रासादतुल्य भव्य इमारतीमध्यें आपल्या कामाचीं अनेकविध सूत्रें हालवीत आहे. ही भव्य इमारत म्हणजे कंपनीसंबंधीं विमेदारांनीं दाखविलेल्या विश्वासाचें शाश्वत प्रतीक होय. १९२८ सालीं कॉमनवेल्थ विमा कंपनी निघाल्यापासून व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्रीयांचें पाऊल झपाट्यानें पुढें पडूं लागलें, ही गोष्टहि महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

देशाभिमानी वर्गानें कॉमनवेल्थ कंपनीचें स्वागत पहिल्यापासूनच उत्तम प्रकारानें केलें. कंपनीनें आपलें पन्नास हजारांचें भांडवल अवघा दोनशें एकवीस रुपये, आठ आण्यांचा खर्च करून गोळा केलें, यावरून ही गोष्ट दिसून येणारी आहे. पहिल्याच वर्षी कंपनीला रु. ११,५९,००० चें विम्याचें नवीन काम मिळालें आणि कंपनीनें रु. ७,०४,२५० चीं विमा पत्रकें दिलीं. कंपनीची ही प्रगति सालोसाल एकसारखी वाढत गेली, हें खालील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

| वर्ष | काम | हप्त्याचें उत्पन्न | लाइफ फंड |
|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. आ. पै |
| १ लें | ७,०४,२५०–०–० | २७,२६४–०–० | ४४२-७-८ |
| २ रें | ९,१२,३७५–०–० | ३९,२७७–०–० | ११,५००-११-१० |
| ३ रें | १०,५३,७५०–०–० | १,१४,३९७–०–० | ६२,३९७–६–९ |
| ४ थें | १२,३५,२५०–०–० | १,५०,३५२–०–० | १,२४,०३९ –१–२ |
| ५ वें | १८,२७,२५०–०–० | २,२१,४०१–०–० | २,२९,३४४–५ –० |
| ६ वें | २४,३०,०००–०–० | ३,००,९७५–०–० | ३,९५,५२४–१५–६ |
| ७ वें | २८,१६,०००–०–० | ४,०४,५४१–०–० | ५,२६,३९५–३–० |
| ८ वें | ३२,२३,७५०–०–० | ५,०९,२३१–०–० | ८,०८,४१३–३–३ |
| ९ वें | ४०,३९,७७३–८–० | ६,३४,६७०–०–० | ११,८९,५[illegible]–१०–४ |
| १० वें | ४५,०५,०००–०–० | ७,२९,९५२–०–० | १४,५२,२७[illegible]–१२–३ |

कंपनीची ही जी सर्वांगीण प्रगति झाली ती अतिशय अल्प खर्चांत व अल्पावधींत झाली आहे. त्यामुळें कंपनीची कीर्ति सर्व देशभर पसरली आणि तिला भारतीय विमा–क्षेत्रांत आज अग्रस्थान प्राप्त झालें आहे.

### मूल्यमापनें

कंपनीच्या वाढत्या आर्थिक स्थैर्याची प्रत्येक व्हॅल्युएशनमध्यें झालेली प्रगति खालील कोष्टकावरून दिसून येईल.

| मूल्यमापन | वर्ष | शिल्लक | त्रैवार्षिक नफा | |
|---|---|---|---|---|
| | | | हयातीनंतर | हयातींतील |
| | | रु. आ. पै | रु. | रु. आ. पै |
| १ लें. | १९३२ | २५,४१३-१-३ | ३६ | ३६–०–० |
| २ रें | १९३५ | ७१,९००-०-० | ४५ | ३७–८–० |
| ३ रें | १९३८ | २,२१,०४५-०-० | ५४ | ४५–०–० |

### प्रचार कार्याचा व्याप व विस्तार

प्रारंभीं प्रारंभीं कॉमनवेल्थ विमा कंपनीनें, आपल्या स्वतःच्या प्रांतांत प्रचार कार्याची संघटना करण्याचें धोरण ठेवलेलें होतें. नंतर लवकरच कॉमनवेल्थनें सर्व हिंदुस्थानभर प्रचारकार्य करण्यास सुरुवात केली. सध्या कॉमनवेल्थच्या पांच प्रमुख शाखा मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली आणि अहमदाबाद येथें आहेत.

मुंबई शाखेचा उद्घाटन-समारंभ त्या वेळचे मेयर, श्री. के. एफ. नरिमन, यांच्या अध्यक्षतेखालीं १९३५ सालीं साजरा करण्यांत आला. अहमदाबादची शाखा १० जुलै १९३७ रोजीं, के. श्री. बळवंतराव ठाकोर, एम्. एल. ए., अहमदाबाद, यांचे हस्तें उघडण्यांत आली. याशिवाय हिंदुस्थानांतील मोठमोठ्या प्रसिद्ध शहरीं आणि व्यापारी केंद्रांच्या ठिकाणीं कंपनीच्या उपशाखा, मुख्य एजन्सी, स्पेशल एजन्सी व ऑर्गनायझिंग ऑफिसेस् आहेत.

# कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

## अध्यक्ष आणि मॅनेजिंग एजंट



खानबहादूर एम्. एन. मेहता
कंपनीचे विद्यमान अध्यक्ष.



श्री. न. चिं. केळकर
कंपनीचे १९३७ पर्यंतचे अध्यक्ष



श्री. रा. न. अभ्यंकर
मॅनेजिंग एजन्ट

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल........ | रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ... | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल........ | रु. | ३,०२,९५० |
| वसूल झालेलें भांडवल... | रु. | १,५१,४७५ |

**शाखा**

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

**डायरेक्टर्स**

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढता येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मॅनेजर.

# रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| *रजिस्टर्ड ऑफिस :* | *बिझिनेस ऑफिस :* |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें २ | ९९२A सदाशिव पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

# S. B. JOSHI & Co.

**ENGINEERS & CONTRACTORS**

| | |
|---|---|
| Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City |



# सुखाचा शोध

मिनर्व्हा ११ वा आठवडा

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

**सरकारी आणि निमसरकारी रोखे**

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११०—७ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०२—२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३–१२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८७–१२ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | ९९—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८६—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९१–१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | ९९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | ९७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६३) ... .. | १०६—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | ११६—० |

**मंडळ्यांचे भाग**

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

**बँका**

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १३७—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ९९—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३३–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १४९७–८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०७—० |

**वीज**

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३१—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १८३—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३७६—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४९०—० |

**रेल्वेज**

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ९५८—८ |

**इतर**

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २५८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४८—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २६—३ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३५—२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४०१५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | १९१–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १३४—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ४१५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | २२१२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १३८—० |





एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38
Exceeds
Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR
On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.

# अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

# कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. (ऑनर्स), एलएल. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर

# विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

**वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये**

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोग्यांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

श्री इंडो फॉरिन एजन्सीज (डि. नं. १)
१५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७१।३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.